# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक 30/01/2020 (गुरूवार)
# (दुपार)

---

## आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्या आरोपीतांना अटक

पो.स्टे. भिवापुर :– अंतर्गत 28 कि.मी. अंतरावर गळपेठ नांद येथे दिनांक 27/01/2020 चे 13.30 वा. पुर्वीपासुन आरोपी क्र. 1) रितेश अमृत घरत, वय 29 वर्ष, रा. गळपेठ नांद हा फिर्यादींची बहीन/मृतक नामे– कु. शितल मधुकर बोरकर, वय 21 वर्ष, रा. गळपेठ नांद हिच्या सोबत एकतर्फी प्रेम करीत होता. दि. 26/01/2020 चे रात्री 21:00 वा. आरोपी क्र. 1 हा फिर्यादीच्या वडीलांचे घराचे खिडकीमधुन पाहत असतांना फिर्यादी व तिची बहीन कु. शितलने त्यास हटकले व शिवीगाळ करीत असतांना आरोपी क्र. 2) सचिन अमृत घरत, वय 32 वर्ष, रा. गळपेठ नांद याने फिर्यादीला शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली. तसेच आरोपीने कु. शितल हिच्या डोक्याचे केस पकडुन, तिला ढकल–ढुकल केली. यानंतर फिर्यादीच्या बहीनीच्या मनावर परीणाम झाल्याने तिने थिमेट नावाचे विषारी औषध प्राशन केले. प्रकृती खराब झाल्याने तिला उपचारकामी मेडीकल कॉलेज, नागपुर येथे भरती केले असता दिनांक 29/01/2020 चे पहाटे 03:00 वा. तिचा मृत्यू झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सौ. सरिता रविन्द्र गायकवाड, वय 24 वर्ष, रा. मौजा गेळपेठ नांद यांचे रिपोर्ट वरुन व मर्गच्या तपासात आरोपी कारणीभूत असल्याचे निष्पन्न झाल्यावरून पो.स्टे. भिवापुर येथे आरोपीतांविरुध्द कलम 306, 504, 506 भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला असून आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक श्री. भस्मे 9764946808 हे करीत आहे.

## शासकीय कामकाजात अळथळा निर्माण करणाऱ्या आरोपीस अटक

पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 22 कि.मी अंतरावर मौजस बेसुर बस स्टॉप, उमरेड येथे दिनांक 28/01/2020 चे 18:15 वा. ते 19:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– शामराव भुरबाजी मेश्राम, वय 45 वर्ष, रा. बस स्टॉप उमरेड हे उमरेड एम.एच. 40/8716 क्रमांकाच्या आगार बसने उमरेड हिगणघाट उमरेड बस मध्ये प्रवासी बसवुन सिर्सी, समुद्रपुर, जाम, हिगंणघाट मार्ग सायंकाळी जात होते. दरम्यान बेसुर फाटयावर प्रवासी आरोपी नामे– भरत पतीराम घरत, वय 32 वर्ष, रा. हिवरा हिवरी, ता. उमरेड याचा बेसुर फाटयावर स्टॅाप आल्याने प्रवाशी यास उतरण्यास सांगितले असता, आरोपीने हिवरा हिवरीला बसने सोडुन दया असे म्हणुन फिर्यादीला शिवीगाळ केली. फिर्यादीने त्यास खाली उतरण्यास सांगितले असता आरोपीने फिर्यादीचे कॉलर पकडुन धक्का–बुक्की

केली व फिर्यादी बसमध्ये बसले असता आरोपीने कोणतीतरी वस्तु बसच्या कॅबीनच्या डाव्या बाजुच्या काचाला मारून काच तोडून नुकसान केले. ती वस्तु फिर्यादीच्या डोक्याला लागुन डोक्यातुन रक्त निघाले आणी शासकीय कामात अडथळा निर्माण केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपी विरुध्द कलम 353,427,332 भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर आरोपीला अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार श्री. मारोती राऊत 9975213230 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर